महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर – ४१६ ००४

---

**परिपत्रक क्र. कोविमं/शाखा माध्यमिक परीक्षा/2459 /दिनांक : २१.११.२०१९**

**विषय : मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत .. ..**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL DATA BASE वरुन ऑनलाईन पध्दतीने **तसेच** पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे नियमित शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने दि. दि. १५/१०/२०१९ ते २०/११/२०१९ या कालावधीत व विलंब शुल्कासह दि. २१/११/२०१९ ते ३०/११/२०१९ या कालावधीत भरावयाची होती. परंतु आवेदनपत्रे भरताना माध्यमिक शाळांना तांत्रिक व इतर अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब सदर आवेदनपत्रे भरण्यास मुदतवाढ देण्यात येत असून सदर मुदतवाढीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

सदर आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** किंवा **www.mahasscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांमार्फत नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL DATA BASE वरुन आणि पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या मुदत वाढीच्या तारखा | माध्यमिक शाळांनी चलन download करुन बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा. | **वितरण केंद्राकडे** माध्यमिक शाळांनी बँकेत शुल्क भरेलल्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-List जमा करावयाच्या तारखा |
|---|---|---|---|
| (अ) नियमित शुल्कासह | मंगळवार दि. १५/१०/२०१९ ते शनिवार दि. ३०/११/२०१९ | बुधवार दि.१६/१०/२०१९ ते बुधवार दि.११/१२/२०१९ | **सोमवार दिनांक १६/१२/२०१९** |
| (ब) विलंब शुल्कासह | रविवार दि. ०१/१२/ २०१९ ते मंगळवार दि. १०/१२/२०१९ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | | |

अ) **स्थानिक** माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-List जमा करावयाची तारीख – **सोमवार दि.१६/१२/२०१९ अशी आहे.**

ब) आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांनी Pre-List प्रिंट करून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रातील सर्व माहिती अचूक असल्याची खात्री करावी व विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर Pre-List चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.

(कृ.मा.प.)

आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळेमार्फत भरावीत. सर्व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१) नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL DATA BASE वरुन SAVE होत नसल्यास त्यांनी उपरोक्त दिलेल्या मुदतीत ALL APPLICATION च्या LINK वरुन आवेदनपत्रे भरावयाची आहेत.
२) सर्व विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.
३) नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.
४) आवेदनपत्रांसोबत नियमित/विलंब शुल्क भरल्याशिवाय संबंधितांचा निकाल जाहीर केला जाणार नाही याची सर्व माध्यमिक शाळा प्रमखांनी नोंद घ्यावी.

## ** वितरण केंद्र प्रमुखांना महत्वाची सूचना **

**वितरण केंद्र प्रतिनिधींनी त्यांच्याकडे माध्यमिक शाळांनी नियमित व विलंब शुल्कान्वये बँकेत शुल्क भरेलल्या चलनासह विद्यार्थ्यांच्या जमा केलेल्या याद्या व Pre-List**
**बुधवार दिनांक १८/१२/२०१९ रोजी मंडळ कार्यालयाकडे जमा करावीत.**

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

प्रति,
१)सर्व मुख्याध्यापक, मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा,
जिल्हा- सातारा, सांगली व कोल्हापूर.

२) शिक्षणाधिकारी (माध्य.)
सातारा, सांगली व कोल्हापूर.

D:/PATEL.I.A. / Imam10 exam / general work / circulars / mar 19 extended date paripatrak